ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## VOLUME - I ISSUE - III
## OCT. TO DEC. 2020



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with CamScanner

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**● Mailing Address ●**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

Scanned with CamScanner

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Privileges Of Witnesses Under Evidence Law In India | Dr. V. M. More<br>Padmakar Kashinathrao Dhondge | 1-5 |
| 2 | Exchange and Make Use of Knowledge | Shri. Vijay S. Malekar<br>Dr. Dhananjay W. Deote | 6-9 |
| 3 | Importance of "Total Quality Management" in Academic Libraries | Dr.Kashinath Rama Rathod | 10-12 |
| 4 | Impact of Covid-19 Pandemic in Indian Education System with Special Reference to Trends in Higher Education | Gourab Das | 13-17 |
| 5 | Physico-Chemical Parameter And Ichthyofaunal Diversityof Fresh Water Reservoir Majalgaon Dam In Maharashtra State, India. | Sitaram B. Ingole, | 18-25 |
| 6 | Role of Retailer as a Service Provider in Business | Dr.Songirkar Nitin Bhatu. | 26-29 |
| 7 | Translation of Leo Tolstoy`s Short Story The Coffeehouse of Surat from English into Marathi With a Note on Loss And Gain | Dr.Raut Sunil R. | 30-36 |
| 8 | "A Study of Depression on Mental Health among Post-Graduate College Students" | Dr. Ravindra Ramdas Shinde | 37-40 |
| 9 | Population Growth & Unemployment | Mohamad Mustafa Mujawar<br>Dr.Shivalingappa B.P<br>Pradeep B.S | 41-44 |
| 10 | Psycho social problems of Tuberculosis patients of Chikkamagaluru District | Kirankumar H. M.<br>Dr. Lokesh M. U. | 45-48 |
| 11 | Location Quotient of Rural Population in Beed District | Dr. Jitendra Vitthalrao Ghodke | 49-54 |
| 12 | Dimensions of knowledge | Dr. A. A. Khapre<br>Dr. Dhananjay W. Deote | 55-62 |
| 13 | Challenges Faced By Parents Of Children With Learning Disability | Pradeep .B.S | 63-66 |
| 14 | Green Banking In India | Dr. Ravindra Pundlik Patil<br>Mr. Kamlesh Bhimraj Vispute | 67-70 |
| 15 | Traditionally used plant species to cure wound and bone fracture healing | A.M. Shrirame | 71-76 |
| 16 | Status of English in India as 'Auntie Tongue' | Prof. Prajakta Raut, | 77-81 |
| 17 | History Of Economic Thoughts - Dr. B. R. Ambedkar | Dr. Bhoge Digamber Bhagwat | 82-85 |
| 18 | Information and Communication Technologies tool for Online Teaching in Physical Education | Mrs. Archana | 86-88 |


Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | Malalaandthe Politics of Literary Controversy | Kailas B. Giri | 89-91 |
| 20 | D.D. Kosambi Contribution to Marxist Historiography | Vasappa Sottammanavar | 92-95 |
| 21 | Decentralization and Women Empowerment in India | Dr. Shivaji Ramachandra Katti | 96-99 |
| 22 | A Study On The Role Of Public Private Partnership Towards Corporate Social Responsibility In India | Mohan V. T.<br>Dr. B. P. Shivalingappa | 100-107 |
| 23 | Application of Teaching and Learning Strategies for students with learning disability | Dr.Atul B Pawar<br>Mrs. Poonam Jagdish Varma | 108-118 |
| 24 | स्तंभलेखन : एक आकलन | प्रा.विठ्ठल संपतराव जाधव<br>प्रा.डॉ.सुरेश वि. जाधव | 119-123 |
| 25 | मराठी आदिवासी कविता | प्रा.डॉ. बडुरे राजू सायन्ना | 124-129 |
| 26 | बहिणाबाईंची गाणी अस्सल देशीकार लेणी | प्रा. प्रल्हाद दत्तराव भोपे | 130-133 |
| 27 | आदिवासींची जीवनमूल्ये (आदिवासी कादंबरीच्या संदर्भात) | डॉ.सुलतान पिरू पवार | 134-139 |
| 28 | नवदोत्तर आदिवासी कादंबरीचे आकलन | अनिल मोतीलाल वळवी | 140-145 |
| 29 | 'सांगावा' मधील अभिव्यक्तिनिष्ठ शैली : एक अभ्यास | प्रा. डॉ. व्यंकट दिगंबरराव कोरेबोईनवाड | 146-148 |
| 30 | महानुभावांचा तुरा पक्ष | डॉ. हंसराज जाधव | 149-156 |
| 31 | काशिबाई कानिटकरलिखित डॉ.आंनदीबाई जोशी ह्यांच्या चरित्राचा थोडक्यात शैलीवैज्ञानिक अभ्यास | उज्ज्वला रोहमारे | 157-164 |
| 32 | काया मातीत मातीत काव्यसंग्रहातील धगधगते सामाजिक जीवन | प्रा.डॉ.सोपान माणिकराव सुरवसे | 165-169 |
| 33 | जीवन पद्धतीचा चिंतन गर्भ आविष्कार: बहिणाबाईची गाणी | प्रा. रमेश रिंगणे | 170-173 |
| 34 | बाबा आमटे यांच्या 'करुणेचा कलाम' कवितासंग्रहातील जीवन जाणिवा | प्रा. डॉ. नारायण शिवशेट्टे | 174-177 |
| 35 | शब्दव्रती : शांता शेळके | प्रा.डॉ.प्रियदर्शनी वसंतराव देशमुख | 178-181 |
| 36 | माझ्या वर्तमानाची नोंद जागतिकीकरणाच्या संदर्भात' | प्रा.डॉ.प्रेमला मुखेडकर | 182-185 |
| 37 | बोंबदवंडी आत्मकथनाचे वाङ्मयीन मूल्यमापन | प्रा. लालबा चां. दुमटकर | 186-189 |
| 38 | संत साहित्याचे सामाजिक योगदान | प्रा.डॉ.डी.एम.शेटे | 190-193 |
| 39 | संत साहित्यातील अस्पृश्यता निर्मूलन विचार | डॉ.अनिल व्यंकटराव मुंढे | 194-197 |
| 40 | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | प्रा.समीर रामचंद्र वैरागी | 198-20[illegible] |

# स्तंभलेखन : एक आकलन

संशोधक
**प्रा.विठ्ठल संपतराव जाधव**
मविप्र समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव, ता.चांदवड जि.नाशिक

मार्गदर्शक
**प्रा.डॉ.सुरेश वि. जाधव**
के.टी.एच.एम. महाविद्यालय, जि.नाशिक

मानवी जीवनात माहिती आणि ज्ञानाचे स्त्रोत म्हणून वृत्तपत्रांचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण आहे . समाजात घडणाऱ्या सर्व घटनांची नोंद वृत्तपत्रात घेतलेली असते. वृत्तपत्रे ही शिक्षक, मार्गदर्शक, विश्लेषक, सत्यशोधक, मूल्यरक्षक, टीकाकार आणि सर्व सामाजिक व्यवहाराचे निरीक्षक अशी बहुपदरी भूमिका पार पाडत असतात. बातमी ही वृत्तपत्राचा गाभा असते. मात्र बातमी म्हणजेच वृत्तपत्र असा त्याचा अर्थ होत नाही. बातम्यांबरोबरच संपादकीय, वृत्तलेख, समीक्षा लेख, जाहिराती, स्तंभलेख, मुलाखती, पत्रलेखन अशा अनेक घटकांचा अंतर्भाव वृतपत्र या संकल्पनेत असतो. वृत्तपत्रांबरोबरच इतर जे मुद्रित माध्यमे आहेत त्यातही मोठ्या प्रमाणात स्तंभलेखन केले जाते. त्यात साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके, वार्षिकांक, दिवाळी अंक अशा नियतकालिकांसोबतच अनियतकालिकांचाही समावेश करता येईल.

स्तंभलेखन हा ललित गद्याचाचएक प्रकार आहे. “निबंध, लघु निबंध, आठवणी, अनुभव, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रे, ललित लेख, विनोदी लेखन, स्तंभलेखन इ. चा समावेश ललित गद्यामध्ये होतो.”[१] यासर्व प्रकारांचा विचार केला तर लघु निबंध ते ललित गद्य असा एक व्यापक स्वरूपाचा प्रवास असलेला दिसतो . त्यामुळे ललित गद्य हा संमिश्र प्रकार आहे असे म्हणता येईल. ललित गद्य हे प्रसरणशील, लवचिक, वैविध्यपूर्ण, आणि सर्वसमावेशक असल्याने त्यात स्तंभलेखन देखील येते. स्तंभलेखनामुळे ललित गद्यात मोठ्या प्रमाणात भर पडताना दिसते. स्तंभलेखक जर साहित्यिक असेल, तर त्याच्या स्तंभलेखनाला साहित्यमूल्य प्राप्त होते.

यशस्वी पत्रकार, संपादक आणि उपसंपादकानंतर वृत्तपत्रात अथवा नियतकालिकात त्या त्या क्षेत्रातील प्रथितयश म्हणून नावाजलेले साहित्यिक, खेळाडू, चित्रपटकलाकार,विचारवंत आणि असेच तमाम यशस्वी म्हणून गणना झालेले सर्व क्षेत्रातील लोक स्तंभलेखक म्हणून तितकेच महत्त्वाचे असतात. पत्रकार आणि संपादकीय चमूला वगळूनउरलेल्या प्रथितथश गटाकडे स्तंभलेखनाची जबाबदारी असते. त्यातल्या त्यात लेखनकलेत अव्वल असल्याकारणाने इतरापेक्षा साहित्यिकांना स्तंभलेखनात अधिक गती असते त्यामुळे बहुतांशी दैनिकातील स्तंभलेखन हे साहित्यिकच करताना आढळून येताव

साहित्यिकांच्या लेखनामुळेच वाचकांची संख्या वाढत असते. मराठी वृत्तपत्राचा इतिहास पाहता याचे अनेक दाखले सापडतील. अनेक नामवंत मराठी साहित्यिकांनी स्तंभलेखन केलेले आहे त्या स्तंभलेखांचे नंतरच्या काळात पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. साहित्यिकांची गणना कित्येकांच्या आदर्शात होते. अशा आदर्शांकडून स्तंभलेखनाद्वारे लोकशिक्षणाची महत्त्वाची जबाबदारी पार पाडली जाते. अशा स्तंभलेखनातून मनोरंजन म्हणून हकलेफुलके देण्याचा त्यांचा मानस असतो. विनोदानेही लोकशिक्षण होते हे साहित्यिकांनी दाखवून दिले आहे. विनोदी साहित्यातली बोच कमी करून त्यातला उपहास समजण्याची कुवत स्तंभलेखनामुळे वाढली आहे.

स्तंभलेखनाचे स्वरूप पहाता असे म्हणता येईल, की स्तंभलेखन ही संकल्पना एकरेषीय नाही. स्तंभलेखनाचे देखील विषयानुसार वेगवेगळे प्रकार पडतात. त्या प्रकारांचा आढावा घेण्याआधी स्तंभ लेखन म्हणजे नेमके काय हे समजून घेणे गरजेचे आहे. 'स्तंभ' या शब्दाचा मराठी भाषेत शब्दशः अर्थ खांब असा होतो. परंतु वृत्तपत्रीय लेखनव्यवहारात त्याचा लक्षार्थ ' लिहिण्याची जागा' असा होतो. इंग्रजी भाषेतील Column या शब्दावरून मराठीत स्तंभ हा शब्द रूढ झाला. त्यावरूनच Column Writing म्हणजे 'स्तंभलेखन' ही संकल्पना रूढ झाली. मुळात वृत्तपत्राचा जन्मच इंग्रजी Newspaper या संकल्पनेतून झाल्याने तत्संबंधी अनेक गोष्टींचे अनुकरण मराठीत झाले आहे. त्यापैकी एक स्तंभलेखन हे देखील आहे. स्तंभलेखनात वृत्तपत्राची विशिष्ट जागा एखाद्या विशिष्ट लेखकाला दिलेली असते आणि त्यातून तो सातत्याने लिहित असतो. अधिक सोप्या भाषेत सांगायचे तर वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके किंवाइतर मुद्रित माध्यमांमधून वारंवार प्रकाशित होणारे लेख स्तंभलेख म्हणून ओळखले जातात.हे वारंवार प्रकाशित होणारे लेख एकाच लेखकाकडून लिहून घेतलेले असतात. नामवंत लेखक, खेळाडू, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते असे प्रसिद्ध व्यक्ती स्वतःच्या नावाने दररोज किंवा दर आठवड्यास किंवा विशिष्ट कालावधीत समकालीन घडामोडींवर लिहितात. काही नामवंत पत्रकार, मुक्त पत्रकार केवळ स्तंभ लेखन करूनच आपला व्यवसाय चालवताना दिसतात. माध्यमांनी त्यांच्याकडून हे लेख लिहून घेतलेले असतात. वृत्तपत्र संस्थेद्वारे लेखकांना दिलेल्या काही स्तंभांमध्ये (जागांमध्ये) ते लेखक स्वतःचे मत व्यक्त करतात. अशा स्तंभलेखकांनी लिहिलेले लेख स्तंभलेख म्हणून ओळखले जातात.या संदर्भात श्रीराम संगोराम म्हणतात, "कॉलम" म्हणजे स्तंभ. यासाठी 'सदर' या मुळच्या उर्दू शब्दाला मराठीचा 'बाप्तिस्मा' देऊन आपण सुंदरपणे रुजू करून घेतले आहे. आठवडा-पंधरवडा यातून नियमितपणे लिहिला जाणारा वृत्तपत्रीयतेशी समांतर पण व्यक्तिगत प्रतिक्रिया नोंदवण्याची सूट असलेला मर्यादित शब्दसंख्येचा लक्षवेधी मजकूर म्हणजे स्तंभ."[२]याचा अर्थ असा होतो की, स्तंभलेखनाचे मूळ इंग्रजीतील कॉलम रायटिंगमध्ये असून उर्दू भाषेतील 'सदर' या शब्दाला मराठी रूप देण्यात आले आहे. मराठीत 'सदर' आणि 'स्तंभ' या समांतर संज्ञा मानण्यात आल्या आहेत नियमितपणा हा दोन्हीतला समान दुवा असल्याकारणाने ही गफलत झाली असावी. मात्र वृत्तपत्रविद्या शाखेत या दोन संकल्पना वेगवेगळ्या मानण्यात आलेल्या आहेत.स्तंभलेखन आणि सदरलेखन यातला महत्त्वाचा फरक म्हणजे एका सदरातील मजकूर एकच व्यक्ती लिहिते असे नाही. वेगवेगळे लेखक देखील त्या सदराअंतर्गत लिहू शकतात. शिवाय काहीवेळा सदर लेखकांची नावे प्रसिद्ध होतातच असे नाही. मात्र स्तंभलेखन हा एकच व्यक्ती नियमितपणे करत असतो. नियमितपणा हे स्तंभलेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे एक विशिष्ट स्तंभ एक विशिष्ट लेखक नियमितपणे लिहित असतो. लेखन विषयात वैविध्य असते. त्या त्या विषयावर स्तंभलेखक आपले मत मांडत असतो. लेखकावर विषयाचे बंधन नसले तरी शब्दसंख्येची मर्यादा मात्र असते. या सर्व स्तंभलेखनाच्या वैशिष्ट्यांचा एकत्रित विचार करता असे म्हणता येईल, वृत्तपत्र किंवा नियतकालिकांमधून एकच व्यक्ती सातत्याने विशिष्ट कालमर्यादेत विशिष्ट शब्दसंख्येच्या मर्यादेत अमर्याद विषयांवर लिहित असते, आपले मत प्रकटन करत असते त्या लेखनाला स्तंभलेखन असे म्हणता येईल. अर्थात सदरलेखनाची वैशिष्ट्ये स्तंभलेखनाशी समांतर असल्याने ही व्याख्या सदर लेखनाला देखील लागू पडते. अरुण खोरे यांची व्याख्या पहाता ते सहजपणे लक्षात येऊ शकेल. ते म्हणतात, "विशिष्ट विषयावरील मजकूर विशिष्ट दिवशी प्रसिद्ध होतो त्याला साधारणतः 'सदर', स्तंभ' असे म्हणता येईल."[३] अशाप्रकारे मराठीत सदरलेखन आणि स्तंभलेखन या दोन्ही संकल्पना एकच मानल्या गेल्याने दोन्हीचा स्वतंत्र अभ्यास करता येत नाही. एकत्रितपणे अभ्यास करावा लागतो.

स्तंभलेखन हा वैविध्यपूर्ण असणारा लेखन प्रकार आहे. स्तंभलेखनासाठी कुठलाही विषय वर्ज्य नाही. याउलट विषयातील विविधता हेच त्याच्या लोकप्रियतेचे रहस्य आहे. त्यामुळे सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक-



Scanned with CamScanner

राजकीय-आर्थिक-वाङ्मयीन असे अनेक प्रकारचे स्तंभलेखन आढळते. लेखकाच्या शैलीनुसारही त्याचे वेगवेगळे प्रकार पडतात. विषय आणि लेखनशैली गृहीत धरून स्तंभलेखनाचे ढोबळमानाने पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.अहवालात्मक स्तंभ (Reporting in depth Columns), वैचारिक स्तंभ (Thinking Column), विश्लेषणात्मक स्तंभ (Analytical Columns), कुजबुज स्तंभ (Gossip Columns),विनोदी स्तंभ (HumorousColumns), ग्रंथपरीक्षणात्मक स्तंभ (Book Review Columns), क्रीडा स्तंभ (Sport Columns )प्रश्नोत्तर स्तंभ (Question and Answer ), अध्यात्मिक स्तंभ (Spiritual Column), संपादकीय स्तंभ (Editorial Columns ), संपादकबाह्य संपादकीय स्तंभ (Side Editorial Columns) अशा काही निवडक आणि महत्त्वाच्या प्रकारांचा उल्लेख करता येईल.

अहवालात्मक स्तंभ (Reporting in depth Columns) या स्तंभात एखाद्या घटनेचा किंवा बातमीचा वर्णनात्मक पद्धतीने सर्व बाजूंनी शोध घेऊन परिपूर्ण माहिती दिलेली असते. उदा. एखादी सभा झाली असेल किंवा एखादा कला महोत्सव झाला असेल तर त्याचा संपूर्ण अहवाल अशा प्रकारच्या स्तंभलेखनात दिलेला असतो. वैचारिक स्तंभ (Thinking Column)या वैचारिक स्तंभाची मराठीत मोठी परंपरा आढळते निबंध वाङ्मय हे त्याचे पूर्वरूप आहे. त्यात विचारांना आवाहन केलेले असते. स्तंभलेखक स्वतःचे विचार त्यातून मांडत असतो. शक्यतो विचारवंत म्हणून नावाजलेल्या व्यक्ती अशा प्रकारचे स्तंभलेखन करत असतात. विश्लेषणात्मक स्तंभ (Analytical Columns) या स्तंभलेखनाच्या प्रकारात एखाद्या घटनेचे वा बातमीचे विस्तृतपणे आणि बारकाईने विश्लेषण केलेले असते. शक्यतो राजकीय स्तंभ हे विश्लेषणात्मक स्वरुपाचे असतात. कुजबुज स्तंभ (Gossip Columns) अर्थात गॉसिप स्तंभ हे पाश्चात्य देशांमध्ये फार लोकप्रिय आहे. त्यात कला, साहित्य, संस्कृती, राजकारण, चित्रपट, संगीत या क्षेत्रातल्या बड्याबड्या लोकांच्या खाजगी आयुष्याबद्दल चर्चा केलेली असते. सामान्य लोकांना अशा बड्या लोकांच्या खाजगी आयुष्याबद्दल मोठे कुतूहल असते. त्यामुळे त्याची माहिती देणारे कुजबुजस्तंभ हे मोठ्या चवीने वाचले जातात.विनोदी स्तंभ (HumorousColumns)हा इंग्रजीत फनी कॉलम म्हणून फार प्रसिद्ध आहे. अशा प्रकारच्या स्तंभलेखनात विनोद निर्मिती हा प्रधान हेतू असतो. सामाजिक घटीतांचा, अगदी गंभीर विषयांचा देखील विनोदी पद्धतीने वेध घेतलेला असतो. हसत खेळत एखाद्या व्यक्तीची चेष्टा करत विनोद साधलेला असतो. एखाद्याची मानहानी करणे किंवा अपमान करणे हा या विनोदी स्तंभलेखनाचा हेतू नसतो. त्यातला विनोद हा निखळ स्वरूपाचा असतो. ग्रंथपरीक्षणात्मक स्तंभ (Book Review Columns) हे ग्रंथाची माहिती देणारे असतात. बाजारात आलेल्या नवीन पुस्तकांची किंवा आपल्याला आवडलेल्या ग्रंथाची माहिती वाचकांपर्यंत पोहोचावी हा हेतू ठेऊन ग्रंथपरीक्षणात्मक स्तंभलेखन केले जाते. ग्रंथ परीक्षण म्हणजे त्या ग्रंथाचा आशय-विषय आणि रचना विषयी लेखकाला काय वाटते? एक वाचक म्हणून स्तंभलेखकाचे मनोरंजन झाले का?त्याला त्यातून काही नवीन माहिती मिळते का ? त्या ग्रंथाने भरीव असे काही हाती आले का ?ग्रंथात जो आशय आणि विषय आहे ते वाचल्या नंतर त्याकडे बघण्याच्या आकलनात काही बदल घडला का? त्या निमित्ताने आपल्या दृष्टीकोनात आणि एकंदरीत जीवनविषयक जाणीवांत काही फरक पडला का? याचा आढावा या प्रकारच्या स्तंभलेखनात घेतलेला असतो. क्रीडा स्तंभ (Sport Columns ) हे खेळविषयक असतात. अलीकडे खेळाचे महत्त्व वाढले आहे. सगळ्या वृत्तवाहिन्यांवरून खेळाला चांगले फुटेज मिळते आणि प्रेक्षकवर्गही मोठ्या संख्येने लाभत आहे. खेळाचे हे वाढते महत्त्व लक्षात घेऊन बहुतांशी वृत्तपत्रांनी क्रीडा जगतातील बातम्या देणारे स्वतंत्र पान सुरु केलेले दिसते. तसेच वेगवेगळ्या क्रीडाप्रकारातील तज्ञ व्यक्तींकडून त्या त्या क्रीडाप्रकारासंबंधी स्तंभलेख लिहून घेतले जातात क्रीडास्तंभ लिहिणारे स्तंभलेखक हे शक्यतो साहित्य वर्तुळातील नसतात. क्रीडाप्रकारां विषयी मुलभूत माहिती असणारे क्रीडा तज्ञ असतात किंवा स्वतः खेळाडू देखील असतात. त्यात वेगवेगळ्या खेळांचे तज्ञ असतात. मात्र क्रिकेटने

जागतिक क्रीडाविश्वात मानाचे स्थान पटकावल्याने अधिकाधिक स्तंभलेख हे क्रिकेटवरचे असलेले दिसून येतात.प्रश्नोत्तर स्तंभ (Question and Answer ) हे अलीकडे मराठीत बऱ्यापैकी लोकप्रिय झालेले दिसते. वाचकांशी संवाद साधणाऱ्या स्तंभलेखाला प्रश्नोत्तर स्तंभ असे म्हणतात. हा स्तंभलेखनाचा प्रकार वाचकनिष्ठ असतो. यात वाचक पत्राने आपले प्रश्न स्तंभलेखकास विचारतात व स्तंभलेखक त्यातील निवडक महत्त्वाच्या प्रश्नांना उत्तरे देतात. यात आरोग्यविषयक प्रश्नांचा अधिक भरणा असलेला दिसून येतो. मात्र सकाळ या वृत्तपत्राने सुरु केलेल्या 'प्रश्न तुमचे उत्तर फमुंचे' हा स्तंभ संपूर्ण महाराष्ट्रात फार गाजला होता. अध्यात्मिक स्तंभ (Spiritual Column) हे अध्यात्मिक माहिती देणारे असते.आज बहुतांशी वृत्तपत्रात अध्यात्मिक स्वरूपाचे स्तंभलेखन आढळते. अध्यात्मिक जीवनाविषयी मार्गदर्शन करणारे व अध्यात्मिक ग्रंथांचे निरुपण करणारे स्तंभ म्हणजे अध्यात्मिक स्तंभ होय. आज वेगवेगळ्या वृत्तपत्रात गीता, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा इ. धार्मिक ग्रंथाचे निरुपण करणारे स्तंभलेखन होताना दिसतात.संपादकीय स्तंभ (Editorial Columns )या प्रकारात रोजचे अग्रलेख वगळता त्या त्या वृत्तपत्राचे संपादक विशिष्ट दिवसी स्तंभलेखन करत असतात संपादकांनी स्वतःचे स्तंभलेखन सुरु ठेवणे ही वृत्तपत्रीय लेखनाची एक पद्धतच आहे. संपादकाच्या लेखनाला खूप महत्त्व असते. वृत्तपत्राची विचारसरणी, भूमिका या संपादकीय स्तंभातून कळत असते.याशिवाय संपादकबाह्य संपादकीय स्तंभ (Side Editorial Columns) या नावाच्या स्तंभलेखनाचा देखील एक प्रकार असतो. बहुतेकवेळा संपादक ज्या विषयावर अग्रलेख लिहितो त्याच विषयावर संपादकीय पानावरच स्तंभलेखन केले जाते. स्तंभलेखक त्या विषयासंबंधी आपले मत प्रकटन करतो त्याला इंग्रजीत साईड एडीटोरियल कॉलम म्हणतात. कारण एखादा स्तंभलेखक नुकत्याच घडलेल्या बातमीवर, घटनेवर टीका टिप्पणी करतो. त्यावेळी तो वृत्त टीकाकाराचीच भूमिका बजावत असतो.कदाचित संपादक आणि स्तंभलेखक या दोघांचे एकाच घटनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन आणि आकलन वेगवेगळे असण्याची शक्यता असते. म्हणून अशा प्रकारचे स्तंभलेख मुद्दामहून लिहून घेतले जातात.

याशिवाय सामाजिक प्रतिनिधीस्तंभ, समालोचकांचे पुनरावलोकन स्तंभ, फॅशन कॉलम, वैशिष्ट्यांचा स्तंभ, अन्न स्तंभ,गप्पाटप्पा स्तंभ,संगीत स्तंभ,राजकीय स्तंभ अशा काही स्तंभलेखनाच्या प्रकारांचाही निर्देश करता येईल.

स्तंभलेखनाच्या प्रकारांची चर्चा करता असे लक्षात येते कि, हा वैशिष्ट्यपूर्ण लेखनप्रकार आहे. त्याची वैशिष्ट्ये इतर लेखनप्रकारापेक्षा अत्यंत वेगळे आणि अन्वर्थक अशा प्रकारचे आहेत.नियमितपणा, ताजेपणा, विषयांची वैविध्यता, शब्दांची मर्यादा, तात्कालिकता, स्तंभलेखकाचा व्यक्तिगत दृष्टीकोन, सर्वांगीण माहितीचे स्त्रोत, अकृत्रिमता, अचूकता, उद्दिष्टांची स्पष्टता, वाचकांशी संवाद, सुबोधता, लालित्य इ. वैशिष्ट्ये सांगता येतील परंतु या सगळ्या वैशिष्ट्यांमध्ये नियमितपणा आणि ताजेपणा ही दोन वैशिष्ट्ये महत्त्वपूर्ण आहेत इतर कुठल्याही लेखन प्रकारांमध्ये नियमितता नसते. स्तंभलेखन मात्र नियमितपणे प्रसिद्ध होत असते. शिवाय तात्कालीन घटना व परिस्थितीवर आधारलेले असल्याने त्यात एक प्रकारचा ताजेपणा असतो. स्तंभलेखकाला विषयाचे बंधन नसल्यामुळे स्तंभलेखनात विषयाचे वैविध्य असते. शिवाय वाचक एकाचएका विषयाला कंटाळू शकतात. भिन्न भिन्न रुचीचे वाचक असतात. त्यामुळे स्तंभलेखनात विषयांचे वैविध्य असणे अत्यंत गरजेचे असते विषय कितीही मोठा असला तरी, विशिष्ट शब्दमर्यादेतच तो मांडावा लागत असल्याने स्तंभलेखक कमी शब्दात अधिक आशय सांगत असतो. त्यामुळे त्या लेखनाला अल्पाक्षर रमणीयत्व प्राप्त होत असते. स्तंभलेखकाला आपले मत मांडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असल्याने त्याच्या व्यक्तीगत दृष्टीकोनाचे दर्शन देखील स्तंभलेखनातून होत असते स्तंभलेखन ही एक जबाबदारी असते. त्यामुळे त्यात कुठल्याही विषयाची जुजबी माहिती देऊन चालत नाही. ज्या



Scanned with CamScanner

विषयावर स्तंभलेखन केलेले आहे, त्याची संपूर्ण आणि सर्वांगीण माहिती देणे गरजेचे असते. त्यामुळे स्तंभलेखनाकडे सर्वांगीण माहितीचे स्त्रोत म्हणूनही पाहिले जाते. स्तंभलेखन ही स्तंभलेखकाची स्वाभाविक कृती असल्याने त्यात ओढून ताणून केलेली कलाकुसर दिसत नाही. म्हणून अकृत्रिमता हे त्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. स्तंभलेखन हे एकाचवेळी लाखो लोकांच्या हातात जात असते त्यात अनेक वाचक अभ्यासू असतात, जाणकार असतात. त्यामुळे त्यात अचूकता असणे गरजेचे असते. नसता वृत्तपत्र आणि स्तंभलेखक या दोन्हीची बदनामी होण्याची शक्यता असते. त्यामुळे अचूकता हे देखील स्तंभलेखनाचे वैशिष्ट्य ठरते याशिवाय त्यात वाचकांशी संवाद साधलेला असल्याने ते अधिकाधिक संवादी राहते. सहज संवादासाठी आवश्यक असणारी सुबोधताही त्यात अंतर्भूत असते. त्यातल्या लालित्यमुळे तर ते अधिकच वाचनीय बनते.या वैशिष्ट्यांमुळे स्तंभलेखन अधिक वाचनीय आणि लोकप्रिय होताना दिसतात.

एकूणच असे म्हणता येईल कि, वृत्तपत्र किंवा नियतकालिकातून नियमितपणे होणारे लेखन म्हणजे स्तंभलेखन होय. सदर लेखन आणि स्तंभलेखन हे दोन्ही प्रकार जवळजवळ सारखेच असून त्यांच्यातली भेदरेषा मात्र धूसर आहे. मात्र मराठी लेखक व अभ्यासकांनी सदरलेखनालाच स्तंभलेखन असे म्हटलेले आहे स्तंभलेखन हे एकच व्यक्ती नियमितपणे लिहितो तर सदर अनेक व्यक्ती मिळून करतात हा त्यातला प्रमुख फरक आहे. स्तंभलेखनाचे बरेचशे प्रकार असून त्यात विश्लेषणात्मक, वैचारिक, विनोदी, गॉसिप, वाङ्मयीन, साईड एडोटोरीएल, अध्यात्मिक, ग्रंथ परीक्षणात्मक, समीक्षणात्मक, प्रवास वर्णनपर, उपहासात्मक आदी प्रकारांचा समावेश आहे. स्तंभलेखन करताना काही घटक अत्यंत आवश्यक असतात याशिवाय स्तंभलेखकाकडे स्तंभलेखनासाठी आवश्यक गुण असावे लागतात. तसेच स्तंभ लेखन करताना काही पथ्येही पाळावी लागतात. स्तंभलेखन ही एक प्रकराची लेखकाची कसोटीच असते. कसोटीला उतरलेले स्तंभलेखन वाचकांमध्ये लोकप्रिय होते.

**संदर्भसूची :-**


१. पाटील तानाजी, ललितरंग, कर्मवीर प्रकाशन, पुणे, पृ.१

२. नांदुरकर मोरेश्वर , (संपा) साहित्यसूची स्तंभलेखन विशेषांक, लेख- संगीत स्तंभलेखनाचे मंतरलेले दिवस श्रीराम संगोराम, दिवाळी अंक १९९६, पृ.६०

३. भणगे गं. मो. , (संपा) वृत्तांत, अहवाल- पुणे नगर वाचन मंदिर, अखिल भारतीय साहित्य संमेलन अधिवेशन ५२ वे पुणे, प्र. १९७८


◆◆◆



Scanned with CamScanner